INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.428 (SJIF 2026)

# समांतर सिनेमाचा ऱ्हास : एक अभ्यास

# (The decline of parallel cinema: A study)

**कुणाल गौतम ऐनापुरे**

संशोधक विद्यार्थी,

इतिहास विभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र, भारत)

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/06.2026-61297426/IRJHIS2606006**

**प्रस्तावना** :

न्यू वेव्ह सिनेमा, ज्याला सामान्यतः आर्ट फिल्म किंवा आर्ट-सिनेमा किंवा समांतर सिनेमा म्हणतात. हा मुख्य प्रवाहातील व्यावसायिक सिनेमाचा पर्यायी प्रकार आहे जो भारतीय सिनेमात एक वेगळी चळवळ म्हणून उदयास आला. इटालियन नववास्तववाद ,फ्रेंच न्यू वेव्ह आणि जपानी न्यू वेव्ह सिनेमाने आपला ठसा उमटवला त्याच वेळी बॉलीवूडच्या व्यावसायिक सिनेमाच्या विरूद्ध एक वेगळी चळवळ म्हणून भारतात समांतर सिनेमाची सुरुवात झाली. भारतीय सिनेमासृष्टीत १९२० आणि ३० च्या दशकापासून वास्तववादाचा ट्रेंड दिसून येतो. हा ट्रेंड मराठी चित्रपटसृष्टीत पहिल्यांदा ओळखला गेला. निर्माते-दिग्दर्शक व्ही. शांताराम यांचा मूक मराठी सिनेमा ***सावकारी पाश*** (1925) उल्लेखनीय आहे.भारतातील न्यू वेव्ह किंवा समांतर सिनेमाची चळवळ पहिल्यांदा बंगाली सिनेमात सुरू झाली. बंगाली चित्रपटसृष्टीने भारतीय चित्रपटसृष्टीला सत्यजित रे, मृणाल सेन आणि ऋत्विक घटक यांच्यासारखे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रपट निर्माते दिले आहेत. चाळीस आणि साठच्या दशकात भारतातील समांतर सिनेमा चळवळीने सिनेमाच्या मुख्य प्रवाहावर प्रभाव टाकला आणि प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. सिनेमातील त्यांच्या वास्तववादी चित्रणामुळे, हे सिनेमे आजही समाजशास्त्रज्ञ आणि इतिहासकारांसाठी भारतीय सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचा अभ्यास करण्याचे महत्त्वाचे माध्यम आहेत. १९५० पासून सुरु झालेली हि चळवळ ९० दशकात सिनेमाच्या बदललेल्या मूल्यांमुळे कालानुरूप मागे पडली.

**संशोधनाची उद्दिष्टे** :

- समांतर म्हणजे काय ? याचा आढावा घेणे.
- समांतर सिनेमा ऱ्हासाला कारणीभूत असणाऱ्या घटकांचा आढावा घेणे.
- समांतर सिनेमाच्या ऱ्हासामुळे झालेला परिणाम अभ्यासणे .

**संशोधन पद्धती** :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन सामग्री** :

या शोधनिबंधासाठी संदर्भग्रंथ,मासिके,पाक्षिके,वर्तमानपत्रे आणि इंटरनेट यांसारख्या दुय्यम साधनांचा वापर केला आहे

**संशोधनाची व्याप्ती** :

प्रस्तुत शोधनिबंधात १९२० सालापासून ते साल २००० पर्यंत च्या समांतर सिनेमाचा आढावा घेतला आहे.

**समांतर सिनेमा** :

*समांतर सिनेमा म्हणजे काय ,तर मुळात आपल्याकडे जी व्यावसायिक चित्रपटांची प्रथा आहे तिच्यापासून फारकत घेणारी चित्रपटांची शाखा.हिचा प्रवास जरी व्यावसायिक सिनेमाला लागून झाला असला तरीही ती आपल्या मूल्यांमध्ये तडजोड करून व्यावसायिक शाखेला सामील होणार नाही हे इथ सुचवलं जात.* [१]

50 च्या दशकात समांतर सिनेमाला गती आली. बंगालमध्ये याची सुरुवात झाली आणि बंगाली चित्रपटसृष्टी चित्रपट निर्मात्यांनी समाजाशी संबंधित असलेल्या सामाजिक समस्यांवर (उदा. गरीबी, शोषण, शेतकऱ्यांचे गंभीर प्रश्न ) वास्तववादी सिनेमे बनवण्यास सुरुवात केली. 1960 च्या दशकात ही चळवळ शेवटी हिंदी सिनेमा किंवा बॉम्बेपर्यंत पोहोचली. हा विशिष्ट सिनेमा हा सिनेमाचा एक गैर-व्यावसायिक प्रकार होता कारण अधिकाधिक व्यवसाय निर्माण करण्याची कल्पना नव्हती. त्यामुळे त्याच्याशी एक शब्द जोडला गेला तो म्हणजे 'आर्ट सिनेमा'. त्यामुळे आर्ट सिनेमा, समांतर सिनेमा, पर्यायी सिनेमा - या सर्व संज्ञा भारतीय न्यू वेव्ह सिनेमाचे वर्णन करण्यासाठी वापरल्या जात आहेत.समांतर सिनेमाने प्रेक्षकाला जागं केलं आणि त्यांच्या आजूबाजूच्या वातावरणाचा वेध घेतला आणि त्यांना चैतन्य मिळवून दिलं. या सिनेमांनी देशाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक तसेच राजकीय वातावरणावर एक प्रकारचे भाष्य केले. या विशिष्ट काळात आलेल्या सर्व सिनेमांनी मुख्य प्रवाहातील सिनेमांपेक्षा एक विशिष्ट शैलीत्मक दृष्टिकोन सामायिक केला. ते प्रायोगिक चित्रपट होते ज्यांना फारसे आर्थिक यश मिळाले नाही कारण त्यांपैकी काहींना प्रेक्षकांचा फारसा प्रतिसाद मिळाला नाही. FTII आणि NFDC च्या स्थापनेमुळे या सिनेमाद्वारे भारताची संस्कृती प्रक्षेपित करण्याचे साधन म्हणून सरकारचे वास्तववादी सिनेमा (समांतर सिनेमा) निर्मितीला प्रोत्साहन मिळाले.

सुरुवातीचा समांतर सिनेमा अनेकदा खूप वास्तववादी आणि प्रायोगिक असा होता की प्रेक्षकांना कळण्यापलीकडे होता . त्यामुळे हळुहळू समांतर सिनेमा विकसित होत गेला आणि मुख्य प्रवाहातील सिनेमाच्या मधोमध बसलेला सिनेमा आणि प्रेक्षकांसाठी खूप-वास्तववादी-पॅलेट समांतर सिनेमा म्हणून विकसित झाला. समांतर सिनेमाचा हा अवतार प्रेक्षकांच्या पसंतीस उतरू लागला. प्रादेशिक भाषा मराठी, तमिळ, तेलगू, मल्याळम, आणि ओडिया यामधून सुद्धा समांतर सिनेमाची निर्मिती होऊ लागली भारतात समांतर सिनेमा चळवळ बंगाल,केरळ आणि कर्नाटक राज्यात उद्याचे कारण म्हणजे डावी विचारसरणी आणि तेथील बिगर काँगेसी सरकार यांच्या सहयोगाने हि चळवळ विकसित झाली. बंगालमध्ये समांतर सिनेमा ऋत्विक घटक यांचा *मेघे ढाके तारा* (१९६०), *नागरीक* (१९७७), केरळ मध्ये अडूर गोपालकृष्णन यांचा *कोडियेट्टम* (१९७८) कर्नाटक मध्ये गिरीष कासारवल्ली यांचा *घटश्राद्ध* (१९७७) आणि हिंदी भाषेत सर्व प्रथम मृणाल सेन यांनी *भुवनशोम* (१९६९) या सिनेमाद्वारे हिंदी सिनेमामध्ये समांतर सिनेमाची सुरवात केली.मराठी समांतर सिनेमाची सुरवात नाटकांमधून झाली पुढे ती फॅशन बनली. मराठी मध्ये जब्बार पटेल यांचा *सामना* (१९७४) हा प्रथम मराठी समांतर सिनेमा आला. हि चळवळ हळूहळू भारतात प्रादेशिक भाषेत पसरू लागली. यामुळे समांतर सिनेमाला अधिक गती मिळू लागली आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय ख्याती मिळाली . या चळवळीने हिंदी चित्रपटसृष्टीला काही अप्रतिम अभिनय प्रतिभाही प्रदान केली ज्यात ओम पुरी, शबाना आझमी, स्मिता पाटील, नसीरुद्दीन शाह, दीप्ती नवल, फारुख शेख, अमोल पालेकर आणि पंकज कपूर यांसारख्या अनेक दिग्गज कलाकारांचा समावेश होता.

**समांतर सिनेमाच्या ऱ्हासाला कारणीभूत असणारे घटक :**

विशेषत: 70 आणि 80 च्या दशकात समांतर सिनेमा खरोखरच चांगली कामगिरी करत होता.अनेक आंतराष्ट्रीय मंचावर समांतर सिनेमाने भारताचे नेतृत्व केले. पण कालांतराने समांतर सिनेमा मागे पडू लागला.त्याला अनेक स्पर्धक निर्माण झाले. ह्या ऱ्हासपर्वाला अनेक घटक कारणीभूत ठरले,ते पुढीलप्रमाणे -

◆ **सामाजिक गतिशीलता (Social mobility) बदलणे :**

भारत स्वतंत्र झाला तेव्हा आपली ओळख एक कृषिप्रधान देश म्हणून होती. शेती हा महत्वाचा व्यवसाय होता .त्यावर आधारित आपला समाज होता. पण काळानुरूप सामाजिक गतिशीलते मुळे परिस्थिती बदलली.याला मुख्य कारण होते सरकारी धोरणे , गुणवत्ता पूर्ण शिक्षा , सामाजिक वातावरण ,वाढीव उत्पन्न यामुळे भारतातील गरिबी काही प्रमाणात कमी झाली ,शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. आणि भारतात **मध्यम वर्ग** या नवीन वर्गाची निर्मिती झाली.समांतर सिनेमाचा मुख्य विषय हा गरीबी,जातीव्यवस्था ,शोषण हा असल्याने तो कालानुरूप कालबाह्य होत गेला . त्यामुळे सिनेमाची मूळ हेतू बाजूला पडला.

◆ **आर्थिक घटक :**

समांतर सिनेमा निर्मिती हि लघुत्तम बजेटवर आधारलेली होती. अशा सिनेमांवर अधिक खर्च होत नसे पण कालांतराने गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक सिनेमाकडे आकर्षित झाले . समांतर सिनेमाला एक ठराविक वर्गातील प्रेक्षकवर्ग होता त्यामुळे गुंतवणूकदाराला अधिक फायदा होत नसे तो जास्त करून तोट्यातच असे .सरकारी मदत सुद्धा अल्पशा प्रमाणावर होत असल्याने हळूहळू समांतर सिनेमा गुंतवणूकदार व प्रेक्षक ह्यांच्यापासून लांब गेला.

◆ **तांत्रिक प्रगती :**

काळानुरूप कॅमेरा क्षेत्रात मोठी प्रगती झाली.सिनेमा निर्मितीच्या गुणवत्तेत मोठा बदल झाला. 2D, 3D, 4D कॅमेरा अँगल तसेच ७० MM पडदा ह्या गोष्टी आल्या . यामुळे समांतर सिनेमा तांत्रिक ह्या तांत्रिक प्रगतीपासून दूर होता.. याच काळात दूरचित्रवाणीने उद्योगात प्रवेश केला. दूरदर्शन सुरु झाले आणि 1990 च्या दशकात त्याला खूप लोकप्रियता मिळाली.मनोरंजन आणि लोकशिक्षण याचा विचार करून मोठ्या प्रमाणावर सांस्कृतिक कार्यक्रम दूरदर्शनवर सुरु केल्याने सिनेमा पाहणाऱ्या सर्वच क्षेत्रातील प्रेक्षकांची घट झाली.[२] आणखी एक गोष्ट म्हणजे सॅटेलाइटवरून चित्रपट डाऊनलोड करून भारतभरच्या सिनेमागृहात दाखवण्याची टेलिव्हिजनसारखी सोय उपलब्ध झाली. महानगराबाहेरच्या अनेक थिएटर्सनी 'डाउनलोड'करून चित्रपट दाखवायची सुविधा करून घेतली. त्यामुळे प्रत्येक रंगीत प्रिंटवर होणारा सत्तर/ऐंशी हजार रुपये खर्च कमी करणे आणि एकाच आठवड्यात अनेक ठिकाणी सिनेमा प्रदर्शित करणे शक्य झाले.[3] अशा अनेक पातळीवर तांत्रिक दृष्ट्या समांतर सिनेमा त्याच्या अनेक प्रतिस्पर्ध्यांसोबत स्पर्धा करण्यास अयशस्वी ठरला.

◆ **सरकारी धोरणे आणि नियम :**

९० च्या दशकात भारतीय अर्थव्यवस्थेवर आर्थिक दबाव तीव्र होता की भारताने विविध आंतरराष्ट्रीय संस्थांकडून घेतलेली विविध कर्जे चुकवण्याल्या अग्रक्रम दिला. IMF आणि जागतिक बँकेने 1991 मध्ये भारताला बेल आउट म्हणून जाहीर केले , परंतु हे सर्व घडल्यानंतर काही मोठ्या आर्थिक सुधारणा देखील झाल्या आणि त्यातील एक महत्त्वाची म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेचे उदारीकरण. अर्थव्यवस्थेवर लावलेले निर्बंध कमी करून सरकारी हस्तक्षेप कमी केला गेला. परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यात आले.[४] अर्थव्यवस्थेच्या उदारीकरणानंतर उत्पादन खर्चात वाढ झाली. उदारीकरणामुळे परकीय गुंतवणूकदारांनी चित्रपट निर्मितीमध्ये गुंतवणूक केली त्यामुळे सिनेमा

हा एक मोठा उद्योग बनला. गुंतवणूकदारांना फक्त अशाच सिनेमामध्ये रस होता ज्यांना निश्चित यश मिळे. समांतर सिनेमा मध्ये अशी सुरक्षितता नव्हती. त्यामुळे गुंतवणूकदार समांतर सिनेमा निर्मिती मध्ये गुंतवणूक करण्यास रस घेत नसत.

**♦ प्रेक्षकांची प्राधान्ये आणि मागण्या :**

भारतात सिनेमा उद्योग प्रेक्षकांवरच चालत होता. समांतर सिनेमा चा प्रेक्षकवर्ग हा मोजकाच होता.९१ च्या दशकात भारताने उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्याने अनेक परदेशी सिनेमा भारतात प्रदर्शित झाले . प्रेक्षकांमुळे व्यावसायिक आणि परदेशी चित्रपटांची मागणी अधिक वाढली त्यामुळे मोठ्या प्रमाणावर स्पर्धा निर्माण झाली.[५] समांतर सिनेमाला प्रेक्षकच राहिला नाही. जरी वेगळे विषय असणारे सिनेमे सिनेमागृहात प्रदर्शनासाठी येत पण अपुऱ्या संख्येमुळे या सिनेमाचे शो रद्द होत असत.

**समांतर सिनेमाच्या ऱ्हासाचा परिणाम :**

50 च्या दशकात समांतर सिनेमाला गती आली ती इटली च्या नववास्तववादी सिनेमा आणि फ्रेंच न्यू वेव्ह मुळे . भारतात प्रथम बंगालमध्ये याची सुरुवात झाली आणि बंगाली सिनेसृष्टीत निर्मात्यांनी समाजाशी संबंधित असलेल्या सामाजिक समस्यांवर वास्तववादी चित्रपट बनवण्यास सुरुवात केली. 1960 च्या दशकात ही चळवळ शेवटी हिंदी सिनेमात पोहोचली. ७० आणि ८० च्या दशकात समांतर सिनेमा उच्च शिखरावर होता पण ९० च्या दशकात हा सिनेमा घसरणीला लागला. व्यावसायिक सिनेमे मोठ्या प्रमाणावर चालत असताना समांतर सिनेमाची मात्र पीछेहाट होऊ लागली.

**♦ सिनेमाच्या थीम मध्ये बदल :**

अनेक निर्मात्यांनी समांतर सिनेमाला वाचवण्यासाठी काळानुरूप बदल केले. वैशिष्ट्ये आणि उद्दिष्टांबरोबर तडजोड केली म्हणजेच एक मध्यममार्ग शोधून काढला.याचे पूर्ण श्रेय श्याम बेनेगल यांना द्यायला हवे. मध्यममार्गी सिनेमा म्हणजे काय ? तर समांतर आणि व्यावसायिक या दोन्ही शाखांच्या चित्रपटांची वैशिष्ट्य असणारा सिनेमा. हे सिनेमे प्रेक्षक मिळवण्यासाठी आशय वा मूळ हेतूशी तडजोड करत नाहीत.[६]

उदा. श्याम बेनेगल यांनी ***झुबेदा*** या सिनेमात करिष्मा कपूर हा ग्लॅमरस चेहरा निवडला.

**♦ भारतीय सिनेमाचे व्यापारीकरण :**

भारतात सिनेमाचा उदय झाला तेव्हा तो एक समाजाचा आरसा म्हणून ओळखला जात असे त्यावर व्यापारीकरणाचा एवढा परिणाम नव्हता पण कालांतराने सिनेमा एक उद्योग म्हणून समोर येऊ लागला अनेक नवीन कंपन्या तसेच गुंतवणूकदार सिनेमात पैसे गुंतवून मालामाल होऊ लागले. सिनेमात कपडे,दारू .सिगरेट ह्या ब्रँडचे प्रमोशन होऊ लागले . तरुण पिढीचा सिनेमाकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलला. त्यामुळे सिनेमाच्या अति व्यापारीकरणामुळे जनसंचाराचे उत्तम माध्यम म्हणून त्याची ओळख पुसली गेली. प्रसिद्ध सिने दिग्दर्शक सुभाष घई यांनी NDTV वर व्यापारीकरण या मुद्द्यावर खालील विधान केले ,

*"भारतीय सिनेमा कमाई करने वाला उद्योग बनकर रह गया है। पूर्व में यह एक रचनात्मक उद्योग था, लेकिन अब इसमें व्यापारीकरण ज्यादा घुस गया है। अब कलाकार एक तय दृश्य या अदाकारी के बारे में बात नहीं करते। वे फिल्म की कमाई के बारे में बात करते हैं।"* [७]

उदा. सिनेमात सिगरेट आणि दारू च्या जाहिरातीमुळे त्या ब्रॅण्डच्या कंपन्या भारतात मोठ्या प्रमाणावर पैसे कमवून लागल्या परिणामी तरुणाईला व्यसन लागले.

♦ **सांस्कृतिक ओळख :**

९० नंतर व्यावसायिक सिनेमाने प्रेक्षकांच्या मनावर एक मोठी छाप सोडली. समांतर सिनेमे बघण्याचा कल कमी झाला. समांतर सिनेमे हे समाजाच्या आणि संस्कृतीच्या गाभ्याला धरून असत. प्रसिद्ध मार्क्सवादी सिने समीक्षक जी,के.ऐनापुरे यांनी इराणच्या न्यू वेव्ह चळवळीतील सिनेमांना ***साधेपणाचे मॅजिक*** असे म्हटले आहे याचे कारण म्हणजे त्याच्या सिनेमा व संस्कृती ही एकच आहे. भारतातील समांतर सिनेमाने एक मध्यममार्ग शोधल्याने त्याची सांस्कृतिक ओळख हि पूर्णपणे नष्ट झाली.

♦ **स्वतंत्र सिनेमा निर्मिती आणि बॉक्स ऑफिस वरील परिणाम :**

९० च्या दशकानंतर समांतर सिनेमा निर्मितीचा वेग मंदावला कारण भारतात झालेली सामाजिक आर्थिक आणि तांत्रिक प्रगती. निर्मात्यांनीही यावर उपाय शोधून काढून या सिनेमांना मध्यममार्गी ठेवले. याचा परीणाम असा झाला कि सिनेमा जरी बॉक्स ऑफिस वर फ्लॉप झाला तरी तरी तो विकला जाऊ लागला. यासाठी सिनेमात विविध ब्रँड आणि सिनेमा नायक किंवा नायिका म्हणून ग्लॅमरस चेहऱ्यांचा वापर करण्यात येऊ लागला.

♦ **सिनेमा निर्मात्यांची अधोगती :**

भारतात मृणाल सेन , श्याम बेनेगल,सत्यजित रे यांनी समांतर सिनेमाचे नेतृत्व स्वतः च्या खांद्यावर घेतले होते.सुरवातीला समांतर सिनेमाने प्रसिद्धी मिळवली. आंतराष्ट्रीय स्तरावर नाव हि कमवले पण ९० च्या दशकानंतर निर्मात्यांनीच समांतर सिनेमा बनवताना त्यातील नियमांना बगल देऊन एक नवीन मार्ग शोधला ज्यात सामाजिक विषयाबरोबर गाणी ,मारधाड आणि ब्रँड याना महत्व देण्यात आले. त्यामुळे बहुतांश निर्मात्यांनी व्यावहारिक सिनेमाकडे मोर्चा वळवला.

९० च्या दशकांनंतर समांतर सिनेमाचे रूपच बदलले त्याला व्यापारीकरणाचे स्वरूप आले साहजिकच, स्थानिक प्रश्न, स्थानिकतेचा आग्रह आणि सांस्कृतिक चिंता मध्ये खूप मागे राहिल्या आहेत. याचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे छोट्या पडद्यावरुन गाव हि संकल्पना गायब होत गेली. सिनेमा मुक्त आणि पाश्चिमात्य बनला आहे, त्यामुळे स्थानिकांचा नाश होऊ लागला आहे. नव-उदारवाद आणि जागतिकीकरण हे स्थानिकांसाठी व स्थानिक प्रश्नासाठी सर्वात विनाशकारी ठरले आहेत. उलट आजकाल ज्या प्रकारचा जागतिक समाज निर्माण होत आहे त्यात स्थानिकतेला वाव नाही, असे म्हणायला हवे. ते स्थानिकांच्या खर्चाने बांधले जाणार आहे. साहजिकच आपल्या सिनेमातूनही स्थानिक परिसर बेदखल केला गेला.या सगळ्यामुळे सिनेमाचे स्वरूप बदलले. सिनेमात गुंतवलेले भांडवल परत मिळण्याची शाश्वती नव्हती. अशा प्रकारे, समकालीन परिस्थिती आणि सिनेमाच्या प्रत्येक क्षेत्रातील बदलांमुळे कला सिनेमाचा वेग काही काळ मंदावला. पण जागतिक स्तरावर सुरुवातीच्या विचारसरणी आणि मुक्तीवादी विचारांनी घडवून आणलेल्या बदलांमुळे, रूढीवादी पद्धती मोडून काढल्यामुळे समांतर सिनेमा काहीसा ओसरला. समांतर सिनेमाचा चळवळीचा इतर देशातील चळवळींबरोबर तुलना केली तर समांतर सिनेमा एक मजबूत सिनेमा म्हणावा लागेल भारतातील कारण फ्रेंच(न्यू वेव्ह सिनेमे ) आणि इटली(नववास्तवादी सिनेमे) मधील सिनेमांवर पाश्चत्य सिनेमाचा प्रभाव पडल्याने ती चळवळच नष्ट झाली. याला कारणीभूत होते तेथील प्रेक्षक. पण भारतीयांनी समांतर सिनेमातील बदलांना स्वीकारले व त्याचे मध्यममार्गी रूप स्वीकारले.

**निष्कर्ष** :

समांतर सिनेमाची काही निरीक्षणे नोंदवताना हा सिनेमा त्याच्या मूळ हेतूपासून कसा दूर गेला हे सांगण्याचा प्रयत्न ह्या शोधनिबंधात काही मुद्यांच्या आधारे केला आहे. व्यापारीकरण, उदारीकरण, बदलती सरकारी धोरणे, प्रेक्षकांनी स्वीकारलेला मनोरंजनाचा वेगळा दृष्टिकोन,

जागतिकीकरणामुळे संस्कृतीमध्ये शिरलेली हायब्रीड मूल्ये इ. अनेक कारणांनी समांतर सिनेमाच्या ऱ्हासपर्वाला हातभार लावला. त्यामुळे समांतर सिनेमाला आपल्या मूल्यामध्ये बदल करणे भाग पडले. समांतर सिनेमाने उदारीकरणामुळे निर्माण झालेल्या सिनेमाच्या स्पर्धेला आवाहन दिले आणि पुन्हा एकदा तो एक नवीन सिनेमा म्हणून खंबीरपणे उभा राहिला मात्र मूळ समांतर सिनेमाचा निश्चितच ऱ्हास झाला.

**संदर्भ** :


१) मतकरी गणेश, *चित्रपट प्रवाहांचा इतिहास : जागतीक आणि भारतीय*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २०२२ पृ. ५०४

२) कित्ता पृ. ५१७

३) नांदगावकर सुधीर, सिनेमाचे भारतात आगमन आणि विस्तार (Onine Article)

link -https://www.marathifilmdata.com/athitikatta/cinemache-bhartat-vistar-aani-agaman/

४) डॉ. गवरे सुनील, प्रा.कृष्णा गायकवाड, प्रा.कांबळे बाबासाहेब, प्रा. गायकवाड संतोष, प्रा. गडदे नारायण, *पायाभूत अभ्यासक्रम* – २, संचालक दूर आणि मुक्त अध्ययन संस्था मुंबई विद्यापीठ, २०२१ पृ. ७

५) कित्ता पृ. ११

६) मतकरी गणेश, *चित्रपट प्रवाहांचा इतिहास : जागतीक आणि भारतीय*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २०२२ पृ.५१५

७) संदीप कुमार (NDTV) - सुभाष घई मुलाखत : सिर्फ पैसा बनाने का धंधा बनकर रह गया सिनेमा : सुभाष घई, 29 जून, 2015

Link - https://ndtv.in/filmy/cinema-reduced-to-cash-trap-industry-subhash-ghai-776303